

**डॉ. तुकाराम रामराव फिसफिसे** हे म.शि.प्र मंडळ, औरंगाबाद संचलित, श्री शिवाजी महाविद्यालय,परभणी येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते मागील १३ वर्षांपासून पदवी व ११ वर्षापासून पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करत आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय चर्चासत्र, परिषदा व कार्यशाळेत सहभाग घेऊन आपल्या अभ्यासपूर्ण शोधनिबंधाचे वाचन केले आहे तसेच समकालीन भारतीय समाज-समस्या आणि उपाय या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केलेले आहे. आतापर्यंत त्यांचे विविध विषयांवरील ३० शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. आतापर्यंत भारतीय सामाजिक समस्या, समकालीन भारतीय समाज -समस्या आणि उपाय, Recent Trends in Interdisciplinary Research या ISBN क्रमांक असलेल्या तीन ग्रंथाचे संपादन केले आहे. मागील ११ वर्षांपासून ते राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांना विद्यापीठाचा उत्कृष्ठ कार्यक्रमाधिकारी पुरस्कार मिळाला आहे.



– **डॉ.विश्वनाथ माधवराव सूर्यवंशी** हे म. शि.प्र.मंडळाच्या, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी येथे समाजशास्त्र विषयाचे अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांनी १४ वर्ष पदवी व ११ वर्ष पदव्युत्तर स्तरावर अध्यापन केले आहे. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय चर्चासत्र,परिषदा व कार्यशाळेत सहभागी होऊन आपल्या अभ्यासपूर्ण संशोधनाचे वाचन केले आहे. आजपर्यंत त्यांचे विविध विषयांवरील ३६ शोधनिबंध प्रकाशित आहेत. *भारतातील सामाजिक चळवळी* व *यशवंतराव चव्हाण* हे दोन ग्रंथ प्रकाशित आहेत. त्यांना विद्याभूषण पुरस्कार -२०१० व राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार २०२२ असे दोन पुरस्कार मिळाले आहेत.

SNEHAL PUBLICATIONS
Publishers and Printers

ISBN 978-93-91998-09-7
9 789391 998097
₹ 395/-

भारतीय स्त्री : काल, आज आणि उद्या
संपादक : प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे / प्रा. डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी

# भारतीय स्त्री काल, आज आणि उद्या



संपादक
प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे
प्रा. डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी

१७. कोविड १९ महामारीचा माहूर तालुक्यातील महीलांवर झालेल्या परीणामाचा एक चिकित्सक अभ्यास
**गणेश वामन पाटील** १०९

१८. खेळातील स्त्रीयांचे योगदान
**डॉ. अमोलसिंह दशरथसिंह गौतम** ११७

१९. कौटूंबिक हिंसाचार
**भाग्यशाली अर्जुन घोंगडे, डॉ.तुकाराम फिसफिसे** १२०

२०. भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि महिला
**डॉ. सोमा पी. गोंडाणे** १२६

२१. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यवीरांगना कॅप्टन लक्ष्मी सहगल
**डॉ. मधुकर विठोबा जाधव** १३४

२२. आदिवासी महिलांची स्थिती आणि गती
**डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत** १४१

२३. स्त्री – भ्रूण हत्या एक सामाजिक समस्या
**आर.बी. काळे** १४६

२४. स्त्री आणि जीवन
**विनया केशव कांबळे** १५०

२५. स्त्री भ्रुण हत्या एक नैतिक समस्या
**डॉ. कापुरे राहुल ज्ञानेश्वर** १५७

२६. भारतातील स्त्रियांची सांस्कृतिक प्रगती
**सचिन नागोराव कसबे** १५९

२७. जगविख्यात स्वरसम्राज्ञी.लता मंगेशकर यांचे संगीत क्षेत्रातील योगदान
**सविता कोकाटे** १६३

२८. राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री उद्धाराच्या कार्यातील योगदान
**डॉ. गजानन रा. मुधोळकर** १६९

२९. भारतातील स्त्री साक्षरता
**डॉ. मुकटे आर. डी.** १७८

३०. भारतीय समाजातील लिंग असमानतेचा अभ्यास
**डॉ. गजानन बाबुराव मरगीळ** १८४

३१. लिंग असमानतेची समस्या
**डॉ. रवींद्र पुंजाजी मते** १९२

३२. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया
**कविता अशोक मोराडे** १९६

३३. महिला सबलीकरणात बचत गटांचे महत्व
**गणेशकुमार पेटकर** २०३







३४. अपंगत्त्व व्यक्तीविषयक विचार : एक समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. राजु. एस. पोपळघट, डॉ. गजानन के. सोनुने** २०७

३५. स्त्रिभ्रूण हत्या एक सामाजिक समस्या
**राजेश रा. पाटील** २१३

३६. महिला सुरक्षा
**डॉ. रमेश राऊत** २१७

३७. भारतीय स्त्री जीवनांचा ऐतिहासिक आढावा
**डॉ.सिद्धेश्वर रामचंद्र शेटकर** २२८

३८. नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या
**पाटील एस.एन.** २३३

३९. भारतातील महिलांवर जागतिकीकरणाचे परिणाम
**डॉ.चंद्रशेखर पाटील** २३६

४०. स्त्रीविकासात कायदयाचे योगदान
**भावसार तन्मय प्रभाकर, डॉ.कावळे बंडु नानाभाऊ** २३९


**Assistant Professor**
**Shivaji College, Hingoli.**
**Tq.& Dist.Hingoli.(MS.)**



151

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



२९.

# भारतातील स्त्री साक्षरता

प्रा डॉ. मुकटे आर. डी.
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

साक्षरता हा मानवी जीवनामध्ये एक महत्त्वपूर्ण घटक आहे. मानव विकासाचा निर्देशांक साक्षरता आहे. नानव विकास निर्देशांक वाढवायचा असेल तर साक्षरते मध्ये वाढ करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. हे लक्षात घेऊन मानवाच्या मूलभूत गरजार्मध्ये साक्षरता हा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. साक्षरतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ व्हावी या उद्देशाने केंद्र व राज्य सरकारकडून साक्षरता वाढीसाठी मोठ्या प्रमाणात विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. अनेक नवीन शाळा महाविद्यालयांची निर्मिती केली जात आहे तसेच सर्व शिक्षण अभियानांतर्गत साक्षरते मध्ये वाढ होणे च्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. मानवाच्या दैनंदिन जीवनात उपयोगी असणाऱ्या साक्षरतेकडे वैयक्तिक दृष्टिकोनातून प्रत्येक व्यक्ती लक्ष देत आहे आहे. जीवनातील प्रत्येक घडामोडींमध्ये साक्षरतेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

साक्षरतेच्या अर्थ सामान्यपणे लिहिता वाचता येणे हा आहे. परंतु वेगवेगळ्या देशात साक्षरतेची व्याख्या वेगवेगळे केली जाते. भारतामध्ये राष्ट्रीय शिक्षण अभियानाद्वारे साक्षरतेची व्याख्या केली आहे.ज्या व्यक्तीकडे आपले नाव लिहिता वाचता येण्याचे कौशल्य आहे अशा व्यक्तीला साक्षर असे म्हटले जाते.

थोडक्यात ज्याला लिहिता वाचता येते अशा व्यक्तीला साक्षर व्यक्ती असे म्हटले जाते. ही किमान मर्यादा साक्षरतेच्या संदर्भात सरकारकडून निश्चित करण्यात आलेली आहे.स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या कालखंडात ही किमान पात्रता असणाऱ्या व्यक्तींची संख्या देशात मोठ्या प्रमाणात होते शासनाकडून वेळोवेळी साक्षरते मध्ये वाढ करण्यासाठी आणि शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने अनेक उपाय योजना हाती घेण्यात आल्याआणि आधारे आधारे देशात साक्षरतेचे मध्ये वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न अविरतपणे चालू आहे याचेच फलित म्हणून स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये असलेली साक्षरतेचे प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार आहे







साक्षरतेचे अनेक प्रयत्न करून देशातील एकूण साक्षरता मध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भारतातील साक्षरते मध्ये स्त्री साक्षरता आणि पुरुष साक्षरता असे दोन वेगवेगळे भाग केले जातात की, ज्या द्वारा देशातील पुरुषांची संख्या एकूण संख्या आणि साक्षरता पुरुष संख्या आणि स्त्रियांची एकूण संख्याने स्त्री साक्षरतेचे संख्या ह्या गोष्टी लक्षात येतात. त्या आधारे स्त्री साक्षरता पुरुष साक्षरता या संदर्भामध्ये अभ्यास करताय येते आणि त्याद्वारा ज्या घटकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे अशा मध्ये साक्षरता वाढ करण्याचा प्रयत्न शासनाकडून करता येतो.यासाठी स्त्री साक्षरता आणि पुरुष साक्षरता अशा प्रकारचे वेगवेगळे दोन भाग करण्यात आले आहेत सामान्यपणे असे दिसून येते की,स्त्री साक्षरतेच्या संख्येपेक्षा पुरुष साक्षरतेची संख्या अधिक आहे. ही संख्या अलीकडील काळामध्ये अधिक आहे असे नाही तर अगदी सुरवातीपासून म्हणजे स्वातंत्र्य पासून आज पर्यंत हे ही स्थिती अशाच प्रकारची असल्याचे दिसून येते आणि म्हणून सरकारने त्यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार दोन्ही सरकार कडून स्त्रियांच्या साक्षरतेचे मध्ये वाढ करण्याचा प्रयत्न चालू आहे आणि त्याचे फलित म्हणूनही स्त्री साक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. तरीपण साक्षर पुरुषांच्या संख्येपेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण आजही भारतामध्ये कमी असल्याचे दिसून येत आहे. खऱ्या अर्थाने स्त्री साक्षर आणि पुरुष साक्षरता यांचे प्रमाण सारख्या प्रमाणात असणे आवश्यक आहे कारण समाजामध्ये कौटुंबिक जीवनामध्ये स्त्री आणि पुरुष या दोन्ही घटकांना समान सारखेच प्रकारचे महत्त्व असल्याचे सांगता येते कारण कौटुंबिक किंवा सामाजिक जीवनामध्ये पुरुष जेवढे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.त्याच प्रमाणे स्त्रियाही तेवढीच महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात आणि त्यामुळे दोन्ही घटकांची साक्षरता ही समान प्रमाणात असावी परंतु हे चित्र थोडे वेगळे असल्याचे भारतामध्ये असल्याचे दिसून येते. स्त्रियांची साक्षरता ही महत्त्वपूर्ण बाब आहे कारण कौटुंबिक स्त्रियांचे स्थान कौटुंबिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण आहे. घरामधले घर कामाबरोबरच बालकांचा सांभाळ करणे बालकांचे शिक्षण व संस्कार देणे घरातील उपभोग्य वस्तू त्यामध्ये खाद्य वस्तू आणि चैनीच्या वस्तू ज्याला आपण जीवनावश्यक वस्तू आणि चैनीच्या वस्तू यासंदर्भात असलेली गुणधर्म त्याच्या किमती त्यांचा उपयोग या संदर्भामध्ये माहिती असणे काळाची गरज आहे. त्यासाठी स्त्रियांना साक्षर होणे हे [illegible] महत्त्वाचे आहे आणि म्हणून स्त्रियांची साक्षरता ही एक महत्त्वपूर्ण बाब

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

आहे. केंद्र सरकार राज्य सरकार हे दोन्ही सरकारे मिळून स्त्रियांच्या साक्षरतेचे मध्ये वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करत असताना दिसतात. स्त्रियांच्या मध्ये साक्षरता वाढावी यासाठी साक्षरतेचे महत्व स्त्रियांना पटवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जाहिराती केल्या जातात त्याच बरोबर वेगळेच महिला महाविद्यालय मुलींच्या शाळा त्यामध्ये निवासी शाळा आश्रम शाळा मुलींचे वसतिगृह अशा प्रकारच्या सुविधा निर्माण करून साक्षरते मध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाळाबाह्य मुलींसाठी निवासी शाळा निर्माण केल्या जात आहेत.ज्यामुळे एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी हा प्रयत्न केला जात आहे आणि याचे फलित म्हणून स्त्रियांच्या साक्षरतेचे मध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते स्त्रियांच्या संदर्भात कामगार स्त्रियांची संख्याही वाढत आहे विविध कार्यालय शासकीय निमशासकीय शाळा महाविद्यालय अनेक प्रकारच्या कंपन्या अशाप्रकारे प्राथमिक द्वितीय आणि तृतीय क्षेत्रांमध्ये कर्मचारी स्त्रियांचे प्रमाण वाढते आहे. अनेक ठिकाणी स्त्रिया मुख्य घटक म्हणून काम करताना आणि महत्त्वाची जबाबदारी सांभाळताना दिसून येतात हे या साक्षरतेचा परिणाम आहे म्हणजेच साक्षरता हे स्त्रियांचे सबलीकरण करण्याचे एक साधन आहे हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. तरीपण स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाली ती आहे पुरुषांच्या तुलनेत स्त्री साक्षरतेचे प्रमाण देशात कमी आहे. भारतीय जनगणना २०११ नुसार प्रमाण पाहता ७७८४५४१२०(७४.०४) पैकी पुरुष ४४४२०३७६२ (८२.१४) तर स्त्रियांचे संख्या ३३४२५०३५८ (६५.४६) अर्थात १६.१ ६८% स्त्रियांची साक्षरता पुरुषांच्या तुलनेत कमी आहे ही स्त्री-पुरुषातील असमानता स्पष्ट करते स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना ३३ टक्के पासून ५० टक्के आरक्षण वाटा वाढून देण्यात येत असतानाही स्त्रियांचे स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत भरून निघत नाही ही वास्तवता चिंतेची बाब आहे.

**भारतातील स्त्री साक्षरता**

| जनगणना वर्ष | स्त्री साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|
| 1951 | 8.86 |
| 1961 | 15.35 |
| 1971 | 21.96 |
| 1981. | 29.76 |
| 1991. | 39.29 |
| 2001 | 53.67 |
| 2011. | 65.54 |

स्त्रोत-भारत की जनगणना २०११ योजना,जुलै २०११ पृष्ट क्रमांक ३७





वरील तक्त्यावरून भारतातील स्वातंत्र्य काळापासून स्त्रियांची साक्षरता संदर्भात स्पष्टीकरण होते. सन १९११ च्या जनगणने जनगणनेनुसार स्त्रियांची साक्षरता केवळ ८.८० टक्के होती. त्यामध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते अनुक्रमे१९६१ मध्ये १५.३५ टक्के,१९७१ मध्ये २१.९७ टक्के,१९८१ मध्ये २९ .३६ टक्के,१९९१ मध्ये ३९.२९ टक्के, २००१ मध्ये ५३. ६७ टक्के आणि २०११ मध्ये ६५.४५ टक्के साक्षरता आहे. देशाच्या महिला साक्षरतेच्या प्रमाणामध्ये वाढ होत असताना दिसून येत असले तरीही पुरुष साक्षरतेच्या प्रमाणात तुलनेत स्त्रिया साक्षर त्यांचे प्रमाण अल्प आहे.

**भारतातील स्त्री साक्षरतेची राज्यनिहाय टक्केवारी**

| अ.क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | साक्षरतेचा दर |
|---|---|---|
| 1) | जम्मू-काश्मीर | 58.01 |
| 2) | हिमाचल प्रदेश | 76 .60 |
| 3) | पंजाब | 71 .34 |
| 4) | चंदिगड | 81 .38 |
| 5) | उत्तराखंड | 70.70 |
| 6) | हरियाणा | 66.77 |
| 7) | दिल्ली | 80.93 |
| 8) | राजस्थान. | 52 .66 |
| 9) | उत्तर प्रदेश | 59 .26 |
| 10) | बिहार | 53 .33 |
| 11) | सिक्किम. | 76.43 |
| 12) | अरुणाचल प्रदेश | 59.57 |
| 13) | नागालँड | 76 .69 |
| 14) | मनिपुर | 73.17 |
| 15) | मिझोराम | 89.40 |
| 16) | त्रिपुरा | 83.15 |
| 17) | मेघालय | 73.78 |
| 18) | आसाम | 67.26 |
| 19) | पश्चिम बंगाल | 71.16 |
| 20) | झारखंड | 56.21 |



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

| | | |
|---|---|---|
| 21) | ओरिसा | 64.36 |
| 22) | छत्तीसगड | 60.59 |
| 23) | मध्य प्रदेश | 60.02 |
| 24) | गुजरात | 74.43 |
| 25) | दमन द्विप | 79.59 |
| 26) | दादर नगर हवेली | 65.93 |
| 27) | महाराष्ट्र | 75.48 |
| 28) | आंध्र प्रदेश | 59.74 |
| 29) | कर्नाटक | 68.13 |
| 30) | गोवा | 81 .84 |
| 31) | लक्ष द्विप | 88 .25 |
| 32) | केरळ | 91.98 |
| 33) | तामिळनाडू | 73.86 |
| 34) | पांडेचेरी | 81.22 |
| 35) | अंदमान निकोबार | 81.84 |

**संदर्भ-** प्रतियोगिता दर्पण, हिंदी मासिक, 1 मे 2011 पृ.1776

वरील आकडेवारीवरून भारतातील स्त्री साक्षरतेची राज्यनिहाय टक्केवारी स्पष्ट होते. सर्वात जास्त महिला साक्षरता ही केरळ मध्ये आहे. केरळ राज्यात ९१.९८% स्त्रिया साक्षर आहेत. दुसऱ्या क्रमांकावर मिझोराम हे राज्य असून मी जरा मध्ये ८९.४०% स्त्रिया साक्षर आहेत. तृतीय क्रमांक हा त्रिपुरा राज्याचा लागतो त्रिपुरामध्ये ८३.१५% स्त्री साक्षरतेचे प्रमाण आहे. तर चौथ्या क्रमांकावर चंदीगड राज्य असून यामध्ये ८१.३८% स्त्रिया साक्षर आहेत. सर्वात कमी स्त्रियांचो साक्षरता राजस्थान या राज्यात आहे यामध्ये केवळ ५२.६६% स्त्रिया साक्षर आहेत. बिहारमध्येही स्त्रियांची साक्षरता कमी असल्याचे दिसून येते केवळ ५३.३३% स्त्रिया साक्षर आहेत. स्त्रियांच्या साक्षरता मध्ये महाराष्ट्राचे स्थिती काही राज्यांच्या तुलनेत समाधानकारक आहे महाराष्ट्रात ७५४८%स्त्रिया साक्षर आहेत.

थोडक्यात भारतात काही राज्य वगळता बहुतांशी राज्यामध्ये स्त्रियांची साक्षरता ७५ टक्के पेक्षा कमी असल्याचे दिसून येते.यावरून लक्षात येते की, भारतातआजही स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ते वाढणे आवश्यक आहे.

**संदर्भः-**






- रुद्र दत्त व सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद्र पब्लिशर्स नवी दिल्ली २०१०
- के.एच. ठक्कर,लोकसंख्याशास्त्र,फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५
- एस.के.मिश्रा भारतीय अर्थव्यवस्था,हिमाचल पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली.२००९
- प्रतियोगिता दर्पण, हिंदी मासिक, मे २०११


❑❑❑

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)